Abbott

# ॲबॉट इंडिया लिमिटेड

सीआयएन : एल२४२३९एमएच१९४४पीएलसी००७३३०
नोंदणीकृत कार्यालय : ३, कॉर्पोरेट पार्क, सायन-ट्रॉम्बे रोड, मुंबई-४०० ०७१.
टेलि. क्र.: +९१-२२-५०४६ १०००/२०००
ई-मेल : investorrelations.india@abbott.com वेबसाइट : www.abbott.co.in

## व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'') / अदर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स (''ओएव्हीएम'') द्वारा घेण्यात येणाऱ्या ऐंशीव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व रिमोट ई-वोटिंग

याद्वारा सूचना देण्यात येते की, ''ॲबॉट इंडिया लिमिटेड''ची (''कंपनी'') ऐंशीवी वार्षिक सर्वसाधारण सभा (''८०वी एजीएम'') ''८०व्या एजीम''च्या सूचनेमध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') सर्क्युलर नं. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२३/१६७ दिनांकित ०७ ऑक्टोबर, २०२३ आणि कंपन्या अधिनियम, २०१३च्या अन्य सर्व लागू तरतुदी व त्याखालील तयार केलेले नियम (''कायदा'') यासह वाचलेल्या निगम कामकाज मंत्रालय (''एमसीए'') जनरल सर्क्युलर्स नं. १४/२०२० दिनांकित ०८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२०, २०/२०२० दिनांकित ०५ मे, २०२० व ०९/२०२३ दिनांकित २५ सप्टेंबर, २०२३ नुसार व्हिडीओ-कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मीन्स (''ओएव्हीएम'') याद्वारा गुरुवार, ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी स. १०.०० वा. घेण्यात येणार आहे.

''एमसीए सर्क्युलर्स'' व ''सेबी सर्क्युलर्स''नुसार ''८०व्या एजीएम''च्या सूचनेसमवेत वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक अहवाल सदस्यांना, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरीज/ डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे उपलब्ध आहेत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीत आज म्हणजेच शुक्रवार, १२ जुलै, २०२४ रोजी पाठविण्यात येत आहेत.

ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी खाली दिलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करून नोंदणीकृत करावेत :

- जर भाग प्रत्यक्ष स्वरूपात असल्यास, सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी फोलिओ नं., नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) व आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ. evoting@nsdl.com यावर ई-मेल पाठवून तरतूद करावी.
- जर भाग डीमॅट स्वरूपात असल्यास, भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी डीपी आयडी क्लायन्ट आयडी (एनएसडीएल डीमॅट अकाऊन्ट्सकरिता १६ डिजिट डीपी आयडी + क्लायन्ट आयडी किंवा सीडीएसएल डीमॅट अकाऊन्ट्सकरिता १६ डिजिट बेनेफिशिअरी आयडी), नाव, क्लायन्ट मास्टर किंवा एकत्रिकृत अकाऊन्ट स्टेटमेन्टची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत) व आधार (आधार कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत), इ. evoting@nsdl.com यावर ई-मेल पाठवून तरतूद करावी.

ई-मेल पत्त्याची नोंदणी झाल्यावर, सदस्यास सूचनेची सॉफ्ट प्रत व यूजर आयडीसह ई-वोटिंगकरिता प्रक्रिया आणि या सभेकरिता ई-वोटिंग सक्षम होण्याकरिता पासवर्ड मिळेल. कोणत्याही शंकांकरिता, सदस्य investorrelations.india@abbott.com यावर लेखी विनंती पाठवू शकतील.

कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० आणि सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ४४ (''सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स'') यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०८ नुसार, कंपनी ''८०व्या एजीएम'' बोलाविणाऱ्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्व ठरावांवर इलेक्ट्रॉनिक प्रणालीत सदस्यांना त्यांचे मतदान करण्याकरिता रिमोट ई-वोटिंग सुविधा देत आहे.

ॲक्टअंतर्गत आवश्यक असलेला तपशील याखाली देण्यात आला आहे :

१. ''एजीएम''ची सूचना आणि ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता वार्षिक अहवाल www.abbott.co.in या कंपनीच्या वेबसाइटवर आणि www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर व www.evoting.nsdl.com या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'')च्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.
२. कंपनीने तिच्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक प्रणालीत मतदान सुविधेची तरतूद करून देण्याकरिता ''एनएसडीएल''च्या सेवा नियुक्त केल्या आहेत.
३. रिमोट ई-वोटिंग सुविधा खालील मतदान कालावधीदरम्यान उपलब्ध करून देण्यात येणार आहे :

| | |
|---|---|
| रिमोट ई-वोटिंग सुरू होईल | **सोमवार, ०५ ऑगस्ट, २०२४ रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) पासून** |
| रिमोट ई-वोटिंग संपेल | **बुधवार, ०७ ऑगस्ट, २०२४ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत** |

रिमोट ई-वोटिंगकरिता पूर्वोक्त तारीख व वेळेनंतर अनुमती दिली जाणार नाही. रिमोट ई-वोटिंग प्रणाली पूर्वोक्त कालावधीच्या समाप्तीनंतर ''एनएसडीएल''द्वारा निःसमर्थ करण्यात येईल.

४. ई-वोटिंगकरिता सुविधेची तरतूद ''एजीएम''मध्येसुद्धा करून देण्यात येणार आहे. ''एजीएम''मध्ये उपस्थित राहणारे सदस्य, ज्यांनी रिमोट ई-वोटिंगद्वारा आधीच त्यांचे मतदान केलेले नाही, ''एजीएम''मध्ये मतदान करण्यास हक्कदार असणार आहे. सदस्य रिमोट ई-वोटिंगद्वारा त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविल्यानंतरसुद्धा ''एजीएम''मध्ये सहभागी होऊ शकेल; परंतु ''एजीएम''मध्ये पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
५. रिमोट ई-वोटिंग व ''एजीएम''मधील मतदान या प्रयोजनार्थ कट-ऑफ तारीख ०१ ऑगस्ट, २०२४ (''कट-ऑफ तारीख'') ही आहे. ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेनुसार सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत अभिलिखित आहे, तीच केवळ रिमोट ई-वोटिंग सुविधा तसेच ''८०व्या एजीएम''मधील मतदान सुविधेचा लाभ घेण्यास हक्कदार असणार आहे.
६. सदस्यांच्या मतदानाचा हक्क कट-ऑफ तारखेनुसार कंपनीच्या भरणा केलेल्या समभाग भांडवलाच्या त्यांच्या भागांच्या प्रमाणशीर असेल.
७. ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना युजर आयडी व पासवर्ड ''एनएसडीएल''द्वारा ई-मेलमार्फत पाठविण्यात येतील. जे सदस्य याआधीच ''एनएसडीएल''कडे नोंदणीकृत आहेत ते मतदानाकरिता त्यांच्या विद्यमान यूजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकतील.
८. कोणत्याही व्यक्तीजवळ प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत आणि बिगर-वैयक्तिक भागधारक, जी कंपनीचे भाग प्राप्त करते आणि सूचना पाठविल्यानंतर कंपनीचे सदस्य बनते व कट-ऑफ तारखेनुसार तिच्याजवळ भाग आहेत ती evoting@nsdl.com यावर विनंती पाठवून यूजर आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, तो/ती याआधीच रिमोट ई-वोटिंगकरिता ''एनएसडीएल''कडे नोंदणीकृत आहे, तर तो/ती मतदान करण्याकरिता त्याचा/तिचा विद्यमान यूजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल.

   जर वैयक्तिक भागधारकाकडे डीमॅट स्वरूपात भाग आहेत आणि जी कंपनीचे भाग प्राप्त करते आणि सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि कट-ऑफ तारखेनुसार तिच्याजवळ भाग आहेत तो/ती ''८०व्या एजीएम''च्या सूचनेमध्ये दिलेल्या स्टेप्सचे अनुसरण करील.
९. ''व्हीसी''/''ओएव्हीएम''द्वारा ''एजीएम''मध्ये उपस्थित राहणाऱ्या सदस्यांच्या संख्येची कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत किमान गणसंख्येच्या प्रयोजनार्थ परिगणना करण्यात येईल.
१०. सदस्याद्वारा ठरावावर रिमोट ई-वोटिंग सुविधेद्वारा एकदा मतदान केले गेल्यास त्यास सदर मतदानात फेरबदल करण्यास किंवा पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.
११. श्री. तैझून एम. खुमरी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस नं. ८८) (सदस्यत्व क्र. : एफसीएस ९९३) यांची ई-वोटिंग प्रक्रियेची रास्त व पारदर्शक पद्धतीने छाननी होण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.
१२. परिनिरीक्षक सभेमधील मतदान संपल्यानंतर, सभेमध्ये झालेल्या मतांची गणना करतील आणि कंपनीचे कर्मचारी नसलेल्या किमान दोन साक्षीदारांसमक्ष सभेतील मतदान आणि रिमोट ई-वोटिंगद्वारा होणारे मतदान अनावरोधित (अनब्लॉक) करतील आणि उशिरात उशिरा ''८०वी एजीएम'' संपल्यानंतर अठ्ठेचाळीस तासांत अध्यक्ष किंवा त्यांच्याद्वारा लिखित अधिकृत केलेली व्यक्ती, जर असल्यास, बाजूने किंवा विरोधात झालेल्या एकूण मतांचा एकत्रिकृत परिनिरीक्षकांचा अहवाल, जे सदर अहवाल काऊन्टरसाइन करतील व मतदानाचा निकाल त्वरित घोषित करील.
१३. निकाल ''८०वी एजीएम'' संपताच अठ्ठेचाळीस तासांत अध्यक्षांद्वारा किंवा त्यांच्याद्वारा लिखित अधिकृत केलेल्या व्यक्तीद्वारा घोषित करण्यात येईल. घोषित झालेला निकाल परिनिरीक्षकांच्या एकत्रिकृत अहवालासमवेत त्वरित www.abbott.co.in या कंपनीच्या वेबसाइटवर आणि www.evoting.nsdl.com या ''एनएसडीएल''च्या वेबसाइटवर प्रस्तुत करण्यात येईल. निकाल एकाचवेळी बीएसई लिमिटेड, मुंबईकडे पाठविला जाईल.
१४. सविस्तर प्रक्रिया व मतदानाची पद्धत वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता वार्षिक अहवालासमवेत ई-मेलद्वारा सदस्यांना पाठविण्यात आलेल्या ''८०व्या एजीएम''च्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.
१५. मतांच्या आवश्यक संख्येच्या स्वीकृतीच्या विषयाधीन, ठराव ''एजीएम''च्या तारखेदिवशी म्हणजेच ०८ ऑगस्ट, २०२४ रोजी मंजूर झाल्याचे मानण्यात येईल.
१६. सदस्यास कोणतीही शंका असल्यास, ते सदस्यांकरिता असलेले फ्रीक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू'ज) आणि www.evoting.nsdl.com यावरील डाऊनलोड सेक्शनवर भागधारकांकरिता उपलब्ध असलेले ई-वोटिंग यूजर मॅन्युअल पाहू शकतील किंवा ०२२-४८८६ ७००० यावर कॉल करू शकतील किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे- वरिष्ठ व्यवस्थापक यांना evoting@nsdl.com यावरून लेखी विनंती पाठवू शकतील.
१७. सदस्य रिमोट ई-वोटिंगसंबंधित त्यांच्या शंका/ तक्रारी पाठवू शकतील :

| तपशील | नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड | ॲबॉट इंडिया लिमिटेड |
|---|---|---|
| **नाव व पदनाम** | श्रीमती पल्लवी म्हात्रे<br>वरिष्ठ व्यवस्थापक | श्रीमती संगीता शेट्टी<br>कंपनी सचिव |
| **पत्ता** | ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, ४था मजला, कमला मिल्स कम्पाऊण्ड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०० ०१३. | १६ वा मजला, गोदरेज बीकेसी, प्लॉट सी - ६८, 'जी' ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, एमसीए क्लबजवळ, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ |
| **टेलि नं.** | ०२२-४८८६ ७००० | ०२२-५०४६ १००० / २००० |
| **ईमेल आयडी** | evoting@nsdl.co.in | investorrelations.india@abbott.com |

**लाभांश**

१. ३१ मार्च, २०२४ रोजी संपलेल्या वर्षाकरिता समभागानुसार रुपये ४१०/-च्या अंतिम लाभांशास संचालक मंडळाद्वारा शिफारस केली आहे, आगामी ''८० व्या एजीएम''मध्ये सदस्यांद्वारा मंजूर झाल्यास, अशा सदस्यांना ज्यांनी त्यांचा बँक अकाऊन्ट तपशील अपडेट केलेला आहे आणि ज्या सदस्यांची नावे या प्रयोजनार्थ डिपॉझिटरीजद्वारा सादर केलेल्या तपशिलानुसार, १९ जुलै, २०२४ (''रेकॉर्ड तारीख'') रोजीप्रमाणे भागांचे लाभाधिकारी मालक आणि ज्यांची नावे सदस्यांच्या नोंदवहीत आलेली आहेत, विविध ऑनलाइन ट्रान्स्फर प्रणालीद्वारा इलेक्ट्रानिक पद्धतीत १३ ऑगस्ट, २०२४ रोजी किंवा त्या तारखेपासून प्रदान करण्यात येईल.
२. अंतिम लाभांशाच्या स्वीकृतीत विलंब टाळण्याकरिता, सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांचा बँक तपशील त्यांच्या डिपॉझिटरीजकडे (जेथे डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात भाग आहेत) आणि प्रदानाच्या तारखेदिवशी त्यांच्या बँक अकाऊन्टमध्ये लाभांशाची थेट स्वीकृती होण्याकरिता सेलेनियम बिल्डिंग, टॉवर 'बी', प्लॉट नं. ३१-३२, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, सेरिलिंगपल्ली, हैदराबाद-५०० ०३२ येथे आवश्यक कागदपत्रांसमवेत यथोचितरीत्या स्वाक्षरीकृत फॉर्म आयएसआर-१ पाठवून कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्स्फर एजन्टकडे (जेथे भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत) अपडेट ठेवावा.
३. सदस्यांनी याअधिक नोंद घ्यावी की, ०१ एप्रिल, २०२०च्या प्रभावापासून, वित्त कायदा, २०२०च्या तरतुदींसह वाचलेल्या आणि सुधारित केल्यानुसार आय कर कायदा, १९६१ (''आयटी ॲक्ट'')च्या तरतुदींनुसार कंपनीद्वारा घोषित केलेले व प्रदान केलेले लाभांश तिच्या भागधारकांच्या हाती करयोग्य आहेत आणि कंपनीला लागू दरात भागधारकांना प्रदान केलेल्या लाभांशामधून टॅक्स ॲट सोर्स (''टीडीएस'') वजात करणे आवश्यक आहे. कायद्याच्या कलम २०६एबी मध्ये करदात्यांच्या बाबतीत टीडीएसकरिता, ज्यांनी मागील वर्षाकरिता आय कर परतावा फाइल केलेला नाही, विशेष तरतुदी अनिवार्य केल्या आहेत.
४. असलेला कर दर सदस्याच्या निवासी दर्जावर व कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या कागदपत्रांवरील विभिन्नतेवर आधारित असेल. लागू असल्यानुसार योग्य टीडीएस दर निश्चित करणे आम्हास सक्षम होण्याकरिता सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी https://ris.kfintech.com/form15/ या लिंकद्वारा आयकर कायदा, १९६१च्या तरतुदींनुसार आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.
५. लाभांशाच्या प्रदानावरील टीडीएसच्या वजावटीसंबंधित, फॉरमॅट्ससह कागदपत्रे/ घोषणा सादर करण्याची प्रक्रिया तसेच यासंबंधित सविस्तर तरतुदींचे वर्णन स्वतंत्र पत्रव्यवहाराच्या माध्यमातून सदस्यांना पाठविण्यात आले आहे. ही माहिती www.abbott.co.in या कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

**मंडळाच्या आदेशाद्वारा**

**संगीता शेट्टी**
**कंपनी सचिव**
**सदस्यत्व क्र. : एसीएस १८८६५**

**स्थळ : मुंबई**
**तारीख : १२ जुलै, २०२४**